


■ २२ कॅरेट सोने दर : १,१७,९५०/- ■ चांदी दर : १,६५,०००/-


शब्दांना सत्याची धार

# प्रहार

सिंधुदुर्ग • शनिवार १५ नोव्हेंबर, २०२५

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक ७ • पाने ८ • ₹ ५.००

## बिहार निवडणूक




| | | | |
|---|---|---|---|
| एनडीए | १५६ | ५० | २०६ |
| महागठबंधन | २२ | ९ | ३१ |
| जेएसपी | ० | ० | ० |
| इतर | ५ | १ | ६ |



# बिहारमध्ये पुन्हा
# एनडीएचेच सरकार

## भाजपा नंबर १: राजदसोबत काँग्रेसचेही पानिपत

**पाटणा (वृत्तसंस्था)**

बिहार निवडणुकीत भाजपा-जदयूच्या आघाडीचा दणदणीत विजय झाला असून एनडीएला २०६ हून अधिक जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रीय जनता दलाला मोठा झटका मिळाला असून काँग्रेसचेही पानिपत झाले आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळवत ९५ जागांसह भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले आहे. दुसरीकडे, महाआघाडीचा गड ढासळला असून तेजस्वी यादव मोठ्या अडचणीत आले आहेत. त्यांच्या पक्षाला अपेक्षित यश न मिळाल्याने (पान २ वर)

## आम्ही नितीशकुमार यांच्या नेतृत्वात जिंकलो, पण सीएम पदाचा निर्णय पाचही पक्ष मिळून घेतील –विनोद तावडे

**मुंबई (वृत्तसंस्था)**




बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएने उल्लेखनीय यश मिळवत बहुमताचा टप्पा सहज पार केला आहे. महागठबंधन अनेक अपेक्षा बाळगत निवडणुकीत उतरले असले तरी निकालांनी त्यांचे गणित पूर्णपणे बदलून टाकले. एनडीएच्या या विजयात मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या कारभाराबरोबरच भाजपने आखलेली रणनीती आणि व्यापक प्रचार मोहिमाही (पान २ वर)

## लोहा लोहे को काटता है!

### युवकांनी बिहारमधील जंगलराज संपवलं, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मानले जनतेचे आभार

'फिर एक बार एनडीए सरकार' हे बिहारच्या जनतेने दाखवून दिल्याचे मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. बिहारच्या जनतेने समृद्ध भारतासाठी मतदान केले आहे.बिहारच्या जनतेने सगळे रेकॉर्ड तोडले आहेत. बिहारच्या जनतेने विकासाला मतदान दिले आहे. 'मी एनडीच्या सर्व दलांकडून बिहारच्या महान जनतेचे आभार मानतो', असे नरेंद्र मोदी म्हणाले. 'लोहा लोहे को काटता है, बिहारमध्ये काही दलांनी माय फॉर्म्युला तयार केला होता. मात्र, आजच्या विजयाने नवीन सकारात्मक महिला आणि युश हा फॉर्म्युला दिला आहे. (पान २ वर)

### घुसखोरांना पाठीशी घालणाऱ्यांना योग्य उत्तर



हा विकसित बिहारमध्ये विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक बिहारीचा विजय आहे. जंगलराज आणि तुष्टीकरणाचे राजकारण करणाऱ्यांना बिहारची जनता कुठल्याही परिस्थितीत संधी देणार नाही. या निकालातून व्होटबँकेसाठी घुसखोरांना पाठीशी घालणाऱ्यांना बिहारच्या जनतेने योग्य उत्तर दिले आहे. बिहारने देशाचा मूड स्पष्टपणे दाखवला. मतदार यादीचे शुद्धीकरण आवश्यक आहे आणि त्यास विरोध करणाऱ्या राजकारणाला जागा नाही. जनता आता केवळ परफॉर्मन्स आधारित राजकारणाला मत देते. ज्या विश्वासाने बिहारच्या जनतेने, विशेषतः माता-बहिणींनी एनडीएला बहुमत दिले, त्याहून अधिक समर्पणाने एनडीए त्याची पूर्तता करेल.

– **अमित शहा,** केंद्रीय गृहमंत्री

### बिहारमध्ये काँग्रेसने दुकान बंद करावे




बिहारच्या निवडणुकीत भाजप व एनडीएला मिळालेल्या प्रचंड मोठ्या विजयाच्या पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे प्रथमतः अभिनंदन! दोघांनीही सांगितल्याप्रमाणे जनतेने त्यांच्यावर मोठा विश्वास दाखवत प्रचंड बहुमत दिले आहे. बिहारमध्ये भाजपने दणदणीत विजय मिळवला आहे. आता काँग्रेसने दुकान बंद करावे. त्यांच्याकडे काहीच उरलेले नाही. आमचे विरोधक केवळ विरोधासाठी विरोध करत आहेत. आता तरी त्यांनी हे विरोधाचे राजकारण थांबवले पाहिजे. बिहारच्या निकालातून विरोधकांनी धडा घ्यावा. जनता विकासाला मतदान करत आहे, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.

– **खासदार नारायण राणे,** रत्नागिरी - सिंधुदुर्ग

### जनतेचा सरकारवर विश्वास



बिहार विधानसभा निवडणुकीत आम्हाला प्रचंड बहुमत देऊन राज्यातील जनतेने आमच्या सरकारवर विश्वास व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला दिलेल्या पाठिंब्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. या प्रचंड विजयाबद्दल आमचे सर्व एनडीए सहयोगी चिराग पासवान, जितन राम मांझी आणि उपेंद्र कुशवाह यांचे आभार. तुमच्या सहकार्याने बिहार आणखी प्रगती करेल आणि देशातील सर्वात विकसित राज्यांच्या श्रेणीत समाविष्ट होईल.

– **मुख्यमंत्री नितीशकुमार,** बिहार

# मालवण शहराचा सर्वांगीण विकास आणि जनतेची सेवा हेच लक्ष : आमदार निलेश राणे

- उबाठा गटातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते यांसह नागरिकांचा शिवसेनेत प्रवेश
- आमदार निलेश राणे, शिवसेना जिल्हाप्रमुख दत्ता सामंत यांनी प्रवेशकर्त्यांचे शिवसेनेत केले स्वागत

**मालवण (प्रतिनिधी)**

शहराचा सर्वांगीण विकास आणि जनतेची सेवा हेच लक्ष ठेवून शिवसेना कार्यरत राहणार आहे. राणे साहेबांचे विशेष लक्ष नेहमीच मालवण शहरावर नेहमीच राहिले आहे. आगामी काळातही राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मोठा विकासनिधी प्राप्त करून प्रत्येकाला हेवा वाटेल असे २१ व्या शतकातील आदर्श मालवण शहर बनवणार. (पान २ वर)



आमदार निलेश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत उबाठा गटाच्या अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. ( अमित खोत, मालवण)

# लष्कराने डॉ. उमर नबीचे घर आयईडी बॉम्बस्फोटाने उडवून दिले

## कारवाईतून दहशतवादाविरोधी कठोर संदेश

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ सोमवारी (दि. १०) झालेल्या भीषण कार बॉम्बस्फोटातील मुख्य सूत्रधारावर सुरक्षा दलांनी गुरुवारी (दि. १३) रात्री कठोर कारवाई केली. हल्ल्यातील मास्टरमाईंड दहशतवादी उमर नबीचे घर आयईडी वापरून उडवण्यात आले. या कारवाईत त्याचे संपूर्ण घर जमीनदोस्त झाले आहे. ही कारवाई करून सुरक्षा दलाने दहशतवादाविरोधी कठोर संदेश दिला आहे.

दिल्ली आत्मघाती हल्ल्यात १३ नागरिकांचा मृत्यू झाला असून २० पेक्षा अधिक लोक जखमी झाले आहेत. हल्ल्यातील कारमध्ये अज्ञात



व्यक्तीच्या मृतदेहाचे तुकडे आढळले होते. तर अनेक सीसीटीव्ही फुटेजमध्ये उमर कार चालवत असल्याचे दिसून आले. त्यामुळे कारमधील मृत अज्ञात व्यक्ती हा उमर असल्याचा संशय होता. त्यासाठी त्याच्या आईची डीएनए टेस्ट करण्यात आली. अखेर डीएनए टेस्ट १०० टक्के जुळली आणि उमरनेच हा हल्ला केल्याची खात्री झाली. त्यानंतर सुरक्षा दलाने त्याचे घर उडवून मोठी कारवाई केली आहे. या हल्ल्यात 'व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूल' उघडकीस आले (पान २ वर)

# सृजनाच्या हातांना महाराष्ट्राचा सर्वोच्च सन्मान!

## ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान





**मुंबई**

महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेल्या 'महाराष्ट्र भूषण २०२४' या पुरस्कारासाठी निवड झालेले ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना शुक्रवारी सन्मानपुर्वक प्रदान केला गेला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, (पान २ वर)

# खरडलेल्या शेतजमिनीसाठी मिळणार माती, गाळ, मुरूम, कंकर मोफत!

## जमिनीच्या सुपीकतेसाठी महसूलमंत्री बावनकुळे यांचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)**

अतिवृष्टी व पुरामुळे खरडून गेलेल्या शेतजमिनीला पूर्वस्थितीत आणण्यासाठी लागणारी माती, गाळ, मुरूम, कंकर मोफत पुरवण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला. याबाबतचे परिपत्रक महसूलविभागाने आज जारी केले. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पुरामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्यांची जमीन पुन्हा लागवडी योग्य व सुपीक करण्यासाठी लागणाऱ्या माती, गाळ, मुरूम, कंकर या गौण खनिजांवरील स्वामित्वधन (रॉयल्टी) माफीच्या निर्णयांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे सक्त आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

राज्याच्या अनेक भागात अतिवृष्टी आणि (पान २ वर)

# पर्यावरणवादी पद्मश्री सालूमरदा थिमक्का यांचे निधन

## वयाच्या ११४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**



प्रसिद्ध पर्यावरणवादी, पद्मश्री पुरस्कार विजेत्या सालूमरदा थिमक्का यांचे शुक्रवारी वयाच्या ११४ व्या वर्षी निधन झाले. थिमक्का काही दिवसांपासून आजारी होत्या आणि बेंगळुरूमधील एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते, जिथे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. (पान २ वर)